अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २१ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## महाराष्ट्रात महिला सुरक्षित ;फडणवीसांनी मांडली आकडेवारी

**मुंबई** : महाराष्ट्र हा गुन्ह्यांच्या बाबतीत देशात २० व्या क्रमांकावर आहे, राज्यातील महिला सुरक्षित असून मुंबईत रात्री १२ वाजताही महिला सुरक्षित फिरतात अशी माहिती आज राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.

विरोधकांनी विचारलेल्या प्रश्नानंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेती स्थिती काय आहे याची आकडेवारी फडणवीसांनी माडंली. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था यावर विधानपरिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबईत रात्री १२ वाजता फिरताना महिलांना जी सेफ्टी वाढते ती दिल्लीत वाटत नाही. राज्यात ३ लाख ९४ हजार गुन्हे घडले होते आता त्यात २० हजाराची कमी आली आहे. गुन्ह्यांच्या बाबत आपण देशात आठव्या क्रमांकावर आहोत. खुनाचा प्रयत्नाच्या गुन्ह्यांमध्ये आपण १६व्या क्रमांकावर आहोत. महिलांवरील गुन्ह्याच्या बाबत देखील आपण



मागे अहोत. बलात्काराच्या संदर्भात १६ व्या क्रमांकावर आहोत. अपहरण संदर्भात विचार केला तर आपण नवव्या क्रमांकावर आहोत. महिला अत्याचार प्रकरण हातळण्यासाठी आपण व्यवस्था केली आहे. नर्कोटिक्स मध्ये २०२० साली ५ हजार ३०० आरोपी वर कारवाई केली आहे. मागील २ वर्षांत आपण २४ हजार आरोपींवर कारवाई केली आहे. मुंबईत २ हजार ४०० पान टपऱ्या आपण नष्ट केल्या आहेत.

# देशाविरुद्ध बोलणाऱ्यांना ‘बेड्या’ ठोकणार; गर्दीतून हत्याकांड करणारे ‘सुळा’वर जाणार

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने देशातील कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक शिस्त अबाधित ठेवण्यासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेतला. तीन फौजदारी सुधारित कायदे बुधवारी लोकसभेत मंजूर करण्यात आले. त्यात देशाविरूद्ध बोलणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जाईल. गुन्हा सिद्ध झाल्यास त्याला शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात आहे तसेच देशाला त्रासदायक ठरत असलेल्या मॉब लिंचिंगच्या विरोधात मोदी सरकारने कठोर पाऊल उचलले असून यातील गुन्हेगारांना यापुढे फाशीची शिक्षा दिली जाणार आहे.दरम्यान देशद्रोहाच्या गुन्ह्याबाबत मात्र सत्ताधारी भाजप आणि विरोधी काँग्रेस यांच्यात पुन्हा खटके उडण्याची चिन्हे आहेत.

## तीन फौजदारी सुधारित कायदे लोकसभेत मंजूर

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी लोकसभेत भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर केली. या तीनही विधेयकांना यापूर्वीही सादर केले गेले होते, मात्र खासदारांनी त्यात अनेक बदल सुचविल्यामुळे या कायद्यांना संशोधनासाठी संसदीय समितीकडे पाठविण्यात आले होते. आता पुन्हा एकदा लोकसभेत हे कायदे सादर करून त्यावर सभागृहाची मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी तीनही विधेयक मंजूर झाल्याचे जाहीर केले.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दावा केल्यानुसार नवीन फौजदारी कायद्याच्या विधेयकामुळे देशातील गुन्हेगारी न्याय व्यवस्थेत सुधारणा होणार आहे. ज्यातून दंड, शिक्षा ऐवजी ‘न्याय’ या तत्त्वावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. शाह यांनी तीन फौजदारी कायद्यांचे विधेयक लोकसभेत सादर केले.

ही तीन विधेयके ब्रिटिश काळातील अनुक्रमे भारतीय दंड संहिता (१८६०), फौजदारी प्रक्रिया संहिता (१८८२) व भारतीय पुरावा कायदा (१८७२) या कायद्यांची जागा घेणार आहेत. शाह यांनी ११ ऑगस्ट २०२३ रोजी पहिल्यांदा हे तीन विधेयक मांडले होते. पुन्हा सुधारित विधेयक सादर करत असताना शाह म्हणाले की, नवे फौजदारी कायदे देशातील जनतेला ब्रिटिशकालीन वसाहतवादाच्या मानसिकतेतून बाहेर काढणारे आहेत. आधीचे तीनही फौजदारी कायदे ब्रिटिशांनी तयार केले होते. तेव्हापासून हे कायदे बदलण्यात आले नव्हते. भारत स्वतंत्र होऊनही आजवर आपण इंग्लंडच्या कायद्यानुसार काम करत होतो. हर मॅजेस्टी, लंडन गॅझेट, ब्रिटिश क्राऊन आणि बॅरिस्टर सारख्या संज्ञा या कायद्यामुळे आजही आपण वापरत होतो.

शाह यांनी विधेयक सादर करताना सांगितले की, यापुढे राजद्रोह कलमाची जागा आता देशद्रोह कलम घेणार आहे. भादंविमध्ये राजद्रोहाला सरकारविरोधातील कार्य म्हणून सांगितले गेले होते. मात्र बीएनएसमध्ये त्याला बदलून देशद्रोह असे



बदलण्यात आले आहेत. सरकारवर कुणी टीका करतो शकतो, मात्र जो देशाच्या सुरक्षेला-अखंडतेला बाधा पोहोचवणारे कृत्य किंवा भाष्य करेल, तो या कलमान्वये गुन्हेगार असेल.तसेच मॉब लिंचिंग प्रकाराला गुन्ह्याच्या कक्षेत आणून फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. काँग्रेसने मॉब लिंचिंगच्या प्रकरणावरू आमच्यावर टीका केली. पण त्यावर कायदा तयार केला नाही.

### ▪ मॉब लिंचिंग म्हणजे काय?

मुले पळवून नेणारी टोळी किंवा गोरक्षणाच्या नावाखाली जमावाकडून निष्पापांची हत्या करण्यात आल्याच्या घटना देशभरात विविध ठिकाणी घडल्या. गो-तस्करीच्या संशयातून झालेल्या मारहाणीच्या आणि हत्याकांडांचे अमानुष प्रकार घडले.झुंडशाहीला मॉब लिंजिंग म्हणतात.

### ▪ कोर्टाने बजावले होते...

मॉब लिंचिंगच्या घटनांवर देशभर संतापाची लाट उसळली होती. पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली होती. त्यावर माजी सरन्यायाधीश दीपक मिश्रा, ए.एम. खानविलकर आणि डी. वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने निष्पाप नागरिकांच्या हत्यांबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. 'अशी दुष्कृत्यं अजिबात खपवून घेतली जाता कामा नयेत व तसा भयंकर पायंडा पडता कामा नये. कायदा हातात घेण्याचा अधिकार कुणालाही नाही,' असे न्यायालयाने बजावले होते. 'भविष्यात झुंडशाहीतून असल्या हत्या होऊ नयेत, यासाठी संसदेने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना न्यायालयाने दि.१७जुलै २०१८मध्ये केली होती.

### ▪ खटके उडणार...

देशात राजद्रोह आणि देशद्रोह यावरून भाजप आणि काँग्रेस यांच्यात वाद पेटला होता.देशाविरूद्ध कुणी बोलू नये,असा संकेत आहे पण अलिकडच्या वर्षात बाहेरच्या देशात जावून भारताविरूद्ध वक्तव्य करण्याचे प्रकार वाढले होते.काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परदेशात जावून भारताच्या व्यवस्थेविरूद्ध वक्तव्य केले होते. देशातही वाचाळवीरांची संख्या वाढत चालली होती.आता या कायद्यातील बदलामुळे भारतीय जनता पक्षात आणि काँग्रेस यांच्यात खटके उडण्याची चिन्हे आहेत.

## जिल्हा परिषदेच्या 'बिंदू नामावली' घोटाळ्याचा विधानपरिषदेत पर्दाफाश

### दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची आ.गोपीचंद पडळकरांची मागणी





**सुराज्य/सोलापूर**

शिक्षक भरतीपूर्व सध्या आंतरजिल्हा बदलीचा शेवटचा टप्पा राबविला जात आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेतर्फे जवळपास ७०० शिक्षकांची भरती होणार आहे. मात्र, सोलापूर जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमातील ६२० रिक्त पदांमध्ये ‘एनटी’ संवर्गासाठी एकही जागा नसल्याचे बिंदुनामावलीत नमूद आहे.

सोलापूरसह राज्यातील इतरही काही जिल्हा परिषदांमध्ये अशीच स्थिती आहे. त्यासंदर्भात अधिवेशनात लक्षवेधी द्वारे मुद्दा उपस्थित करत हे षडयंत्र असून दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी आ.गोपिचंद पडळकर यांनी केली आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने त्यांच्याकडील शाळांमधील कार्यरत शिक्षक व रिक्त पदांची बिंदुनामावली तयार केली. त्यानंतर पुण्यातील मागासवर्गीय कक्षाकडून ती तपासून अंतिमही केली. परंतु, मागील सात वर्षांत शिक्षक भरती झाली नसतानाही जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये एनटी - अ, ब व क या संवर्गांसाठी एकही जागा रिक्त नसल्याचे त्या बिंदुनामावलीतून स्पष्ट झाले आहे. त्यासंदर्भात आमदार गोपींचंद पडळकर यांनी अधिवेशनात लक्षवेधी मांडली आहे.


या पार्श्वभूमीवर प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले यांना नागपूरला जावे लागले आहे. मागील बिंदुनामावली व सध्या तयार करून मागासवर्गीय कक्षाने अंतिम केलेली बिंदुनामावली घेऊन ते नागपूरला रवाना झाले आहेत.राज्यात बहुतेक ठिकाणी याच पद्धतीने आरक्षणाच्या जागेवर डल्ला मारला गेला असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

### ६२० जागांमध्ये एकही 'एनटी' नाही

जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या ६२० जागा रिक्त आहेत. त्यात एसटी संवर्गाच्या ४३०, एससी- ५२, ओबीसी- ४२, खुल्या प्रवर्गातील ३४ व 'ईडब्ल्यूएस'मधील ६२ जागांचा समावेश आहे. यामध्ये एनटी प्रवर्गातील एकही पद रिक्त कसे काय नाही, असा प्रश्न लक्षवेधीतून विचारण्यात आला आहे. त्यावर आता संबंधित अधिकाऱ्यांना कागदपत्रांच्या आधारे त्यासंदर्भातील माहिती द्यावी लागणार आहे. सोलापूरसह राज्यातील इतरही काही जिल्हा परिषदांमध्ये अशीच स्थिती आहे.

## उत्तर प्रदेशच्या तरुण मजुराची गळफास घेऊन आत्महत्या

**सुराज्य/सोलापूर**



मोहोळ येथील प्लास्टिक कारखान्यात काम करणाऱ्या एका २० वर्षीय उत्तर प्रदेशच्या तरुणाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कोंडी (ता.उत्तर सोलापूर) येथे बुधवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

बजरंग जगतराम राणा (वय-२०, उत्तर प्रदेश, सध्या साई प्लास्टिक कंपनी, मोहोळ) असे मयत तरुणाचे नाव आहे. त्याचा मृतदेह बुधवार सकाळी १० वाजण्याचा सुमारास कोंडी येथील चंडक यांच्या मोकळ्या जागेतील लिंबाच्या झाडाला शर्टाच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत बजरंग राणा हा मोहोळ येथील साई प्लास्टिक कंपनीतील कामगाराच्या रूममध्ये आपल्या चुलत भावासोबत राहण्यास होता. काल रात्री तो घरातून न सांगता गेला होता.

बुधवारी सकाळी इतर कामगारांनी शोध घेतले असता त्याचा मृतदेह कोंडी येथील मोकळ्या जागेत असलेल्या लिंबाच्या झाडाला शर्टाच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. याची नोंद तालुका पोलिसात झाली असून, कारण समजले नाही. हवालदार महिंद्रकर तपास करीत आहेत.

## गायीच्या दुधासाठी प्रतिलिटर पाच रूपये अनुदान जाहीर

**राधाकृष्ण विखे-पाटील यांची घोषणा**

**मुंबई** : राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. राज्यातील सहकारी दूध संघांमार्फत संकलित होणाऱ्या गाईच्या दुधासाठी दूध उत्पादकास प्रतिलिटर पाच अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

ही योजना राज्यातील फक्त सहकारी दूध उत्पादक संस्थांमार्फत राबवण्यात येणार असल्याचे विखे पाटील म्हणाले. यासाठी सहकारी दूध संघाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३.२ फॅट आणि ८.३ एसएनएफकरीता प्रति लिटर किमान २९ रुपये दूध दर शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर



रोख जमा करणं बंधनकारक आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना शासनामार्फत ५ रुपये प्रति लिटर बँक खात्यावर वर्ग करण्यात येतील.

डीबीटी करण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते हे त्याच्या आधार कार्डशी आणि पशुधनाच्या आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे. त्याची पडताळणी करणं आवश्यक राहील. ही योजना दिनांक १ जानेवारी २०२४ ते दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीसाठी लागु राहणार आहे. त्यानंतर आवश्यकतेनुसार आढावा घेवून मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. ही योजना आयुक्त यांच्या मार्फत राबविली जाणार आहे. याबाबतीत शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे. दुध आणि दुग्धजन्य पदार्थाचे भाव हे प्रामुख्याने मागणी व पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील दुध भुकटी व बटरचे दर यावर अवलंबून असतात. त्यानुसार आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटी व बटरचे दर कमी झाल्यास दुधाचे दर कमी होतात.

## मॉर्निंग वॉक करताना दुचाकीची धडक; वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : पहाटेच्या सुमारास मॉर्निंग वॉक करताना पाठीमागून दुचाकीच्या धडकेत जखमी झालेल्या वत्सला रामचंद्र कोळी (वय-७७, कामाठी गल्ली, अक्कलकोट) या सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सकाळी मयत झाल्या. त्या शनिवारी (१६ डिसेंबर) रोजी पहाटेच्या सुमारास घरातून हन्नूर रस्त्याकडे पायी निघाल्या होत्या. कल्याणशेट्टी शाळेजवळ पाठीमागून अनोळखी दुचाकी धडकल्याने त्या जखमी झाल्या होत्या. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून श्रीशैल (मुलगा) यांनी सोलापुरात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्या मयत झाल्या.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तू फक्त तंत्रशुद्ध खेळायला शिक, आताच पॅकेजचा विचार नको !

कल्याण
589-29-478

मुंबई
357-51-678

# केरळमध्ये झपाट्याने वाढतोय करोनाचा नवा व्हेरिंएट

## ▪ दिल्लीतही रुग्ण आढळले; आरोग्य विभाग अलर्ट

**सुराज्य/सोलापूर**

करोना व्हायरसचा नवा व्हेरिंएट JN.1 चे भारतातील रुग्णांची संख्या वाढत चालली आहे. या व्हेरिंएटचे सर्वाधिक रुग्ण केरळमध्ये सापडले आहेत. गेल्या २४ तासात केरळमध्ये २९२ रुग्ण सापडले आहेत. तर राजधानी नवी दिल्लीत ४ रुग्ण आढळले आहेत.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बुधवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार देशात ३०८ नवे रुग्ण समोर आले आहेत. आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनी या प्रकरणी सर्व राज्यांच्या आरोग्य मंत्र्यांशी बैठक घेतली आहे. केरळमध्ये गछ.१ या नव्या व्हेरिंएटचे सर्वाधिक रुग्ण समोर आले आहेत. गेल्या २४ तासात राज्यात २९२ नवे रुग्ण सापडले असून तिघांचा मृत्यू झालाय. देशाची राजधानी नवी दिल्लीत देखील नव्या व्हेरिंएटचे रुग्ण सापडले आहेत.



मीडिया रिपोर्ट्सनुसार दिल्लीत करोनाचे दोन रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. गेल्या २४ तासात राजधानीत ३ नवे रुग्ण सापडले आहेत. राज्यातील एकूण रुग्णांची संख्या ४ इतकी आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचे मुख्य सचिव आणि आरोग्य सचिवांसोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी आरोग्य यंत्रणेच्या तयारीचा आढावा घेतला. ज्यांना श्वास घेण्यास अडचणी आहेत त्या सर्वांनी काळजी घ्यावी असे बैठकीत सांगण्यात आले.

केरळमध्ये वाढत असलेल्या करोना रुग्णांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने राज्यातील वैद्यकीय सुविधांचा आणि रुग्णालयांचा आढावा घेतला आहे. राज्यात सद्यस्थितीत करोनाचे सर्वाधिक रुग्ण संख्येच्या वेळेस लागलेल्या ऑक्सिजन क्षमतेपेक्षा दुप्पटीने ऑक्सिजन उपलब्ध असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. सर्व जिल्ह्यांमध्ये फ्लूसदृश आजारांच्या रुग्णांचे सर्वेक्षण करण्यात यावे. तसेच सर्वेक्षणामध्ये आढळून फ्लूसदृश रुग्णांची करोना तपासणी करावी. त्याचबरोबर सर्व जिल्ह्यांमध्ये करोना तपासण्यांची संख्या वाढण्याच्या सूचना आरोग्य विभागाने दिल्या आहेत. केरळमध्ये गेल्या काही दिवसांमध्ये करोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच करोना विषाणूचा उपप्रकार असलेल्या जेएन १ या विषाणूचा पहिला रुग्णही केरळमध्ये आढळून आला आहे.

### ठाण्यातील नव्या व्हेरिंएटच्या पहिल्या रुग्णाची प्रकृती चिंताजनक

ठाण्यातील १९ वर्षीय तरुणीला करोनाच्या नव्या व्हेरिंएटची लागण झाल्याचे मंगळवारी समोर आले होते. संबंधित तरुणीवर पालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.मुंबईत या व्हेरियटचे १३ रुग्ण असून राज्यात हा आकडा २४ वर गेला आहे.

### कर्नाटकमध्ये एकाचा मृत्यू

करोनाच्या नव्या व्हेरिएंटचे सर्वाधिक रुग्ण केरळमध्ये सापडले आहे. गेल्या २४ तासात राज्यात २९२ रुग्ण सापडले असून राजधानी दिल्लीत देखील ४ रुग्ण आढळले आहेत. देशभरात २४ तासात नवे ३०८ रुग्ण सापडले आहेत. दरम्यान कर्नाटकमध्ये एकाचा करोनामुळे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. राज्याचे आरोग्य मंत्री दिनेश गुंडू राव यांनी सांगितले की, १५ डिसेंबर रोजी राजधानी बेंगळुरू येथे ६४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला होता. निधनाच्या वेळी संबंधित व्यक्तीला JN1 ची लागण झाली होती की नाही हे माहिती नव्हते.